अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# टोलचे टाळकरी नीतिनभाऊ गडकरी

भारतीय जनता पक्ष कधीही सामान्य जनतेचा पक्ष होऊ शकत नाही आणि म्हणून तो पूर्ण बहुमत मिळवून सत्तेवर येऊ शकत नाही. महाराष्ट्रातल्या बहुजन समाजाचे सामान्य माणसाचे रोजचे प्रश्न घेऊन हा पक्ष कधी लढला आहे, असे कधी फारसे घडले नाही. तिकडे पुण्यात राज ठाकरेंनी टोलविरोधात जंग छेडले आहे. सामान्यांच्या बाजूने आवाज उठवला आहे. जी काही दोन-चार आंदोलने पक्षाने केली असली तरी ती निवडणुकीवर डोळा ठेवूनच केली. पोटतिडीकीने हा पक्ष सामान्य माणसाच्या, गरिबांच्या पाठीशी कधी उभा राहात नाही. म्हणूनच त्याला शेठजींचा पक्ष किंवा शहरी पक्ष म्हटले जाते याची शेकडो उदाहरणे देता येतील. अगदी असाच प्रकार आता टोलबाबत होत आहे. महाराष्ट्रात ज्या टोलविरोधात असंतोषाचा भडका उडाला आहे. त्याबाबत भाजपाची नेमकी भूमिका काय हेच कळत नाही. ज्यांना पक्षात 'मासलीडर' म्हणून मान्यता आहे ते गोपीनाथ मुंडे महाराष्ट्राला टोलमुक्त करण्याची घोषणा करतात. तर ज्यांनी सर्वप्रथम महाराष्ट्रात टोल आणला ते नीतिनभाऊ गडकरी टोलची तरफदारी करतात. महाराष्ट्राला रस्त्यावरचा हा टोल यापूर्वी माहीत नव्हता. तो सर्वप्रथम पुणे-मुंबई द्रुतगती मार्गापासून सुरू झाला. त्यासाठी या नीतिनभाऊंनी आपण कसे गणित मांडून टोल आकारायला लावला हे सांगतात. त्यांची ही टोलची तरफदारी करणारी एक्सप्रेस आयडीया पुढे अशी एक्सचेंज म्हणजे बदलली की, भरमसाठ टोलसाठी रस्त्यांची बांधकामे करण्याचा सपाटाच त्यांनी लावला. ही आयडीया त्यांना आयडीयल करायची होती आणि आपण या आयडीयल आयडीयाच्या पैसेखाऊ भन्नाट योजनेचे कसे भागीदार आहोत हेही प्रस्थापित करायचे होते. केवळ दहा वर्षांत महाराष्ट्रातली रस्ते बांधकामांपेक्षा टोलवसुलीत अग्रणी असलेली ही कंपनी कशी श्रीमंत झाली हे अनेकांना माहीत आहे. आता तर अशा कंपनीच्या संचालक पदावर भाजपाच्याच या मोठ्या नेत्याचे चिरंजीव आहेत. गुजरातमधली अनेक कंत्राटे प्राप्त करण्यात ही कंपनी यशस्वी झाल्याचे सांगितले जाते. असा टोलमार्ग फायदेशीर झाल्याने तो रद्द करावा, असे नीतिनभाऊ गडकरी कसे बरे सांगतील. ज्या टोलला राज्यातल्या सामान्य जनतेचा विरोध आहे, त्याला पाठिंबा देण्याऐवजी टोल कसा आवश्यक आहे हे पटवून देण्यातच गडकरींनी आपली बुध्दी बऱ्यापैकी खर्ची घातली. केवळ टोलच नाही तर महागाईसारख्या अत्यंत ज्वलंत प्रश्नावरसुध्दा या पक्षाने कधी आक्रमकता दाखवली नाही. गॅस सिलेंडरच्या किमती भडकल्यानंतर सरकारला सळो की पळो करून सोडण्याचे काम भाजपाला करता आले असते. परंतु या महागाईची धग या पक्षाच्या नेत्यांना कधी लागतच नाही. स्वत:च्या पोटाला चिमटा बसू द्यायचा नाही आणि आपल्या कपड्यांना माती लागू द्यायची नाही, याची पूर्ण काळजी भाजपा नेते घेत असतात.

## श्रीमंतांचीच वकिली

स्वत:च्या स्वार्थाच्या आड एखादी गोष्ट येत असेल, तर मग भाजपाचे नेते जीव तोडून कामाला लागतात. मग त्यांचे कारखाने कायद्याच्या कचाट्यात सापडत असतील तर ते वाचवण्यासाठी ते नेते जीवाचे रान करतील. परंतु गोदरेजसारख्या एखाद्या कंपनीत मालक अरेरावी करून एकेक प्लान्ट बंद करत असेल तर या पक्षाच्या नेत्यांची तोंडे शिवली जातात. कामगारांची या पक्षाला कधीही सहानुभूती वाटली नाही. म्हणजे आम्ही जे म्हणतो की, सामान्य कामगारांची, गरिबांची बाजू घेऊन संघर्ष करणे त्यांना माहीतच नाही. मुंबईत कफ परेडच्या झोपडपट्टीला आग लागते, आठशे कुटुंबांची वाताहात होते. भाजपाचा एक नेतासुध्दा तिकडे फिरकला नाही. पण कॅम्पाकोला इमारतीच्या नावाने कोल्हेकुई सुरू झाल्यानंतर या पक्षाचे सगळे दिग्गज नेते दिल्लीपर्यंत धावत सुटले. सामान्य परिस्थितीत जगणाऱ्यांचे प्रश्न घेऊन ते तडीस नेण्यासाठी हा पक्ष संघर्ष करत नाही. मात्र स्वत:च्या शेपटावर कोणी पाय दिला तर ते चवताळून उठतात. हेच नीतिनभाऊ गडकरी आयकर खात्याच्या कर्मचाऱ्यांविरुध्द असेच चवताळून उठले होते. पक्षाध्यक्ष असताना त्यांच्या बोगस कंपन्यांविरुध्द आयकर विभागाने चौकशी सुरू केली. त्यावेळी नागपुरात एका जाहीर सभेत या कर्मचाऱ्यांना धमकावण्याचे काम गडकरींनी केले. आता आमची सत्ता येणार आहे. तेव्हा माझी चौकशी करणाऱ्यांना मी पाहून घेईन, अशा शब्दात त्यांनी तोंडाचा दांडपट्टा चालवला होता. अजूनही त्यांचा तो राग कायम आहे. आपले सरकार एकदाचे केव्हा सत्तेवर येते त्याची सर्वात जास्त आतुरता गडकरींना लागली आहे. यासाठी काही अर्थपूर्ण हालचाली त्यांनी सुरू केल्या आहेत. नाशिक, पुण्यातल्या काही स्वयंघोषित अर्थतज्ज्ञांना हाताशी घेऊन एक अहवाल तयार केला गेला आणि त्यातून आयकर रद्द करण्याची अफलातून सूचना केली गेली. यावरून त्यांचा आयकरावर किती राग आहे हे सिध्द होते.

## कमळाबाईचा तऱ्हेवाईकपणा

नीतिनभाऊंची दुसरी आदळआपट म्हणजे त्यांनी आम आदमी पार्टीविरुध्द केलेली शेरेबाजी. या पक्षाचे चिन्ह झाडू आहे. कोणताही झाडू सहा महिनेच टिकतो, असे विधान त्यांनी केले. पण मग तर कमळ तर एका दिवसातच कोमेजून पडते याचे काय? तेव्हा अशा शेलक्या कॉमेंटस करून गडकरी आपले स्थान काय आहे हेच दाखवून देतात. याच आम आदमी पार्टीच्या झाडूने दिल्लीत भाजपाची दाणादाण उडवली. दिल्लीचे प्रभारी म्हणून गडकरींकडे जबाबदारी होती. झाडूपुढे त्यांची डाळ शिजली नाही. परंतु आज भ्रष्टाचाराविरुध्द जनजागृती मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. सामान्य माणसाचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत. त्याच्या बरोबर विरुध्द भूमिका नीतिन गडकरी घेत असतात. पक्षाने शरद पवारांना विरोध करायचा. गडकरींनी मात्र त्यांचे स्वागत करायचे. गोपीनाथ मुंडेंनी टोलमुक्त करण्याची घोषणा करायची. गडकरींनी टोलची वकिली करायची. शरद पवारांच्या आशीर्वादाने आकाराला आलेल्या श्रीमंतांच्या लवासा प्रकल्पाला विरोध करायचा. गडकरींनी लवासा कसे आवश्यक आहे हे पटवून द्यायचे. आदर्श इमारत प्रकरणात भाजपाने कोर्टात जायची तयारी करायची. परंतु या आदर्शमध्ये विदर्भातले गडकरींचे मित्र अडकल्यामुळे त्यांनी तोंडात मिठाची गुळणी धरायची. म्हणूनच झाडूविषयी बोलण्यापूर्वी आपल्या कमळाच्या कशा पाकळ्या पाकळ्या होतात हे त्यांनी बघावे. आमचे शिवसेनाप्रमुख तर भाजपाच्या या तऱ्हेवाईकपणाला 'कमळाबाई' या नावानेच हिणवत असत.